महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!



महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.



महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ८३ वा | दिनांक : २४/१२/२०२४ | वार : मंगळवार


## आरोपींना अटक न झाल्याने समाजबांधव आक्रमक



**बीड :** संतोष देशमुख हत्या प्रकरणी बीडमध्ये सर्वपक्षीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून कलेक्टर ऑफिसवर हा मोर्चा शनिवारी धडकणार आहे.

बीडमध्ये आज सर्वपक्षीय नेत्याची पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. यामध्ये संतोष देशमुख यांची हत्या होऊन १४ दिवस उलटून गेले पण आरोपींना अटक न झाल्याने समाजबांधव आक्रमक झाले आहे.

बीडमधील सर्वपक्षीय बैठकीत मोर्चा काढण्याचा ठराव घेण्यात आला. त्यानूसार २८ रोजी बीड शहरात सकाळी ११ वाजता सर्वपक्षीय भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. खुनासारख्या गंभीर प्रकरणातही पोलिस प्रशासनाकडून आरोपींच्या अटकेत चालढकल केली जाते असा आरोप होत आहे. प्रकरणात कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी सर्व पक्ष व संघटना एकत्र येऊन आंदोलन करणार आहेत. या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आज बैठक घेण्यात आली यावेळी हा निर्णय घेण्यात आला.

संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांसह ग्रामस्थांच्या भावना तीव्र आहेत. मुख्यमंत्र्यांनी जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारावे अशी भावना ही सर्वांची आहे. सगळ्या प्रकरणाचा छडा लावून आरोपीवर तात्काळ खटले दाखल करावेत. फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवून त्यांच्या कुटूंबियांसह मस्साजोगकरांना न्याय द्यावा. अशी मागणी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी माध्यमांशी बोलताना केली.

२ कोटींची खंडणी मागितल्याने मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराड, सुदर्शन घुले आणि विष्णू चाटे यांच्यावर ११ रोजी गुन्हा दाखल झाला. ११ दिवस उलटूनही कराड व घुलेचा शोध लागला नाही.

मुख्यमंत्र्यांनी अधिकारी नेमायला सुरुवात केली आहे. खा. शरद पवार यांनी मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली, उपमुख्यमंत्री अजितपवार यांनी दोन दिवसांत आरोपींना जेरबंदकरण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे दोन दिवस थांबू, नंतर भूमिका घेऊ, असे सरपंच देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख म्हणाले.

बीड येथील अ‍ॅड. बाळासाहेब कोल्हे यांची याप्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणूननियुक्ती के आहे. कोल्हे यांची फी गृह विभाग देणार आहे. कोल्हे यांच्या नियुक्तीचे आदेश शनिवारी अनुभाग अधिकारी, न्यायपालिका विभागप्रमुख वैशाली बोरुडे यांनी काढले.

बीडमधील संतोष देशमुख हत्याकांडाप्रकरणी वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या वाल्मीक कराड यांचे मंत्री धनंजय मुंडे यांच्याशी व्यावसायिक भागिदारी असल्याचा दावा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. आव्हाड यांनी यासंबंधी या दोघांची भागीदारी असल्याचा एक स्क्रीनशॉट पोस्ट केला आहे. यामुळे या दोघांतील कथित परस्पर संबंध पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरले आहेत.

## शरीरावरील टॅटूमुळे उमेदवाराला भरतीसाठी अपात्र ठरवणे बेकायदेशीर

**नागपूर :** शरीरावरील टॅटूमुळे उमेदवाराला भरतीसाठी अपात्र ठरवणे बेकायदेशीर आहे, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या निर्णयाचा दाखला न्यायालयाला दिला. न्यायालयाने सीआरपीएफचा आदेश रद्द करून उमेदवाराला मोठा दिलासा दिला. न्या. नितीन सांबरे आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

सुनावणीदरम्यान सीआरपीएफने घेतलेले आक्षेप घटनेच्या कलम २१ च्या विरोधात असल्याने आणि लेसर उपचारांद्वारे त्याचा टॅटू काढून टाकल्यानंतरही याचिकाकर्त्याला अपात्र ठरवणे विसंगत असल्याने, न्यायालयाने याचिकाकर्त्याला अपात्र ठरवण्याचा निर्णय रद्द केला. याचिकाकर्ते इतर कोणत्याही कारणास्तव अपात्र नसल्यास त्यांची नियुक्ती चार आठवड्यांच्या आत केली जावी, असेही न्यायालयाने आदेश दिले. याचिकाकर्त्याच्यावतीने अ‍ॅड. अमित बालपांडे यांनी तर सीआरपीएफच्यावतीने अ‍ॅड. व्ही. ए. ब्रह्मे यांनी बाजू मांडली.

### 'एन' अक्षराचे टॅटू

याचिकेनुसार, निखिल गर्डेने सीआरपीएफ कॉन्स्टेबल ड्रायव्हर पदासाठी परीक्षा उत्तीर्ण केली. परंतु वैद्यकीय चाचणीदरम्यान त्याच्या उजव्या हातावर 'एन' या इंग्रजी शब्दाचा टॅटू होता. त्यामुळे निखिलला अपात्र ठरवण्यात आले. यानंतर, निखिलने पुनरावलोकन वैद्यकीय चाचणी दिली परंतु पुन्हा टॅटूच्या चिन्हामुळे पुनरावलोकन वैद्यकीय समितीने निखिलला अपात्र ठरवले. त्यामुळे निखिलने न्यायालयाचे दार ठोठावले.

सुनावणीदरम्यान, निखिल गर्डेने न्यायालयाला सांगितले की त्याने वैद्यकीय तपासणीपूर्वी लेसर उपचाराद्वारे हा टॅटू काढला होता आणि प्रत्यक्षात केवळ एक डाग दिसत आहे. २० मे २०१५ रोजीच्या भरती मार्गदर्शक तत्त्वांमध्ये धार्मिक भावना दर्शविणारे टॅटू स्वीकारार्ह आहे. परंतु हा नियम भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ च्या विरोधात आहे, असा युक्तिवाद याचिकाकर्त्याने केला. याचिकाकर्त्यालाही इतर कोणत्याही परीक्षेत अपात्र ठरवण्यात आलेले नाही. त्यामुळे केवळ टॅटूच्या आधारावर नोकरीस अपात्र ठरवणे बेकायदेशीर आहे आणि हा निर्णय रद्द करण्यात यावा अशी मागणी याचिकाकर्त्याने न्यायालयात केली.






## राहुल गांधी केवळ राजकीय हेतूने आले : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आरोप



**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्याविषयी विधान करताना म्हणाले की आम्ही सगळे त्यांचा सन्मान करतो. मंत्रिमंडळात घेण्यात आले नाही तेव्हा आमच्या मनात त्यांना राष्ट्रीय पातळीवर पाठवण्याचा विचार होता, तसेच भुजबळांसारखे नेते आमच्या सोबत असलेच पाहिजेत, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हंटले आहे.

पुढे राहुल गांधी यांनी परभणी येथे दिलेल्या भेटीवर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की राहुल गांधी केवळ राजकीय हेतूने परभणीत आले होते. ही राजकीय भेट होती. लोकांमध्ये जाती जातीत भेद निर्माण करायचे ते गेली अनेक वर्षे काम करत आहेत.

त्यामुळे मला असे वाटते की त्यांचे जे विद्वेषाचे काम त्यांनी त्या ठिकाणी जाऊन केले आहे. आमचे सरकार संवेदनशील असल्यामुळेच या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात येणार आहे. यात सगळे समोर येईल, तसेच कुठल्याही आरोपीला सोडण्यात येणार नसल्याची ग्वाही फडणवीस यांनी दिली आहे.

राहुल गांधी यांनी सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांची भेट घेतली होती. या भेटीनंतर सोमनाथ सूर्यवंशी दलित असल्याने त्याची हत्या केली असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. तसेच या प्रकरणी पोलिस तसेच मुख्यमंत्री जबाबदार असल्याचे देखील त्यांनी म्हंटले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज अतिशय आनंदाची गोष्ट आहे की प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंतर्गत या वर्षी आपल्याला केंद्र सरकारने साडे सहा लाख घरे मंजुर करण्यात आली होती आता ते टार्गेट वाढवण्यात आले आहे. अतिरिक्त १३ लाख घरे आपल्याला देण्यात आली आहेत.

एकूण आपण विचार केला तर जवळपास या वर्षी केंद्र सरकारच्या वतीने गरिबांसाठी, बेघरांसाठी तसेच कच्च्या घरात राहणाऱ्यांसाठी एका वर्षात २० लाख घरे देण्याची घोषणा केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चव्हाण यांनी केली आहे. महाराष्ट्राला मोदी सरकारने दिलेली ही अत्यंत मोठी भेट आहे.

तसेच देशाच्या इतिहासात कुठल्याच राज्यात एका वर्षात एवढी घरे मिळालेली नाहीत. आणखी एक मोठी घोषणा करण्यात आली आहे की ज्यांची नावे सुटली होती त्यांना नव्या सर्वेक्षणात घेण्यात येणार आहे. असा निर्णय माननीय मोदी यांनी केला आहे. आणि हा संकल्प शिवराज सिंह चव्हाण यांनी सांगितला आहे.

**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ डिसेंबर २०२४

# सुशीलादेवी देशमुख विद्यालयात गणित दिन साजरा



**छ. संभाजीनगर (रमाकांत छडीदार) :** येथील सुशीलादेवी देशमुख विद्यालयात डॉ. रामानुजन यांची जयंती गणित दिन म्हणून साजरा करण्यात आला.

मुख्याध्यापक श्री. बी .जे. पहिलवान यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. लक्ष्मण कुऱ्हे यांची उपस्थिती होती. तसेच जेष्ठ गणित शिक्षिका श्रीमती अर्चना गुमास्ते व श्रीमती दिपा माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी डॉ. रामानुजन, आर्यभट्ट , भास्कराचार्य यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारी भाषणे केली. त्यानंतर श्रीमती गुमास्ते, श्रीमती माने , श्री. कुऱ्हे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शेवटी श्री. पहिलवान यांनी अध्यक्षीय समारोप केला.

कार्यक्रमाने संचालन कु. प्रणिता बनसोडे व आभार प्रदर्शन कु. सिध्दी आघाव यांनी केले. कार्यक्रमासाठी विद्यालयाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# तुगाव येथे २५ डिसेंबरला अखिल भारतीय धम्म परिषदेचे भव्य आयोजन.....

**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालूक्यातील तुगाव येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी त्रिरत्न बुध्द समितीच्या वतीने २५ डिसेंबर रोजी नवव्या अखिल भारतीय धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या आठ वर्षांपासून तुगाव येथे प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांच्या सुपीक कल्पनेतून जन्मलेल्या या धम्म परिषदेचे आयोजन तुगाव येथील नागरिक आणि त्रीरत्न बुध्द विहार समितीच्या वतीने नेटकेपणाने केले जाते.

या परिषदेत विविध कार्यक्रम घेतले जाणार आहेत.या कार्यक्रमाचा धम्मावर प्रेम करणाऱ्या उपसकानी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

याप्रसंगी मा.दिलीप माने (मुंबई) , मा.अजित गायकवाड (सोलापूर), मा.पंचशील डावकर(लातूर), मा. दिपक जोमदे(सरपंच, तुगाव ), मा.संजय बिराजदार (उपसरपंच, तुगाव ) हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यावेळी धम्मदेशना करण्यासाठी भदंत नागसेन बोधी(उदगीर),भदंत धम्मसार थेरो (किल्लारी), भदंत सुमंगल (कराळी),भदंत शिवली अंगुलीमाल (जालना), भदंत काश्यप (भालकी, कर्नाटक) इत्यादी उपस्थित राहणार आहेत.

तुगव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती व धम्मचक्र अनुप्रवर्तनाचे ६० वे वर्ष म्हणजे हीरक महोत्सवी वर्ष याचे औचित्य साधून २५डिसेंबर २०१६ पासून अखिल भारतीय बौध्द धम्म परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे.सालाबादप्रमाणे यंदाही नववी धम्म परिषद येत्या २५ डिसेंबर रोजी होत आहे.

यानिमित्त दिवसभर विविध कार्यक्रम होणार आहेत.या कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील समाजबांधवांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून यावे व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने अध्यक्ष नंदकुमार गायकवाड व सचिव राजकुमार कांबळे यांनी केले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002




# तुगांव येथे संपन्न होणाऱ्या "नवव्या धम्म परिषदेसाठी" अध्यक्ष, सचिवासह नूतन कार्यकारिणी जाहीर....

**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तुगाव येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी दि.२५ डिसेंबर रोजी ९ व्या धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या आठ वर्षांपासून तुगाव येथे यशस्वीपणे अखिल भारतीय धम्म परिषदेचे आयोजन केले जाते.नियोजित धम्म परिषदेच्या नियोजन आणि व्यवस्थापनाच्या दृष्टीने गुरुवार दि.२१/१२/२०२४ रोजी सायं. ५:०० वाजता त्रिरत्न बुध्द विहार येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीला तुगावमधील सर्व नागरिक ,बंधू भगिनी,उपासक, उपासिका आणि मागील कार्यकारिणीतील सर्व सदस्य यांच्या सोबतच गावातील नागरिक ,समता सैनिक दलाचे पदाधिकारी, महिला मोठ्या संख्येनी उपस्थित होत्या.धम्म परिषदे बाबत कांही नवीन संकल्पना आणि सूचना संदर्भात चर्चा विनिमय करून यावर्षीच्या नुतन कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली.

अध्यक्षपदादाठी शाहूराजे भोसले यांनी सामाजिक कार्यकर्ते मा.नंदकुमार गायकवाड यांचे नाव सुचवले. तर सचिव पदासाठी देविदास अबा कांबळे यांनी आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार मा.राजकुमार कांबळे यांचे नांव सुचवले त्याला उपस्थित सर्वांनी अनुमोदन देऊन सहमती दर्शवली. प्रारंभी सामूहिक बुध्द वंदना झाली त्यानंतर मा.भालचंद्र लोखंडे यांनी प्रास्ताविकात धम्म परिषदेसंदर्भात सविस्तर विवेचन केले.

धम्म परिषदेची पूर्वपीठिका सांगून, परिषदेची उपयुक्तता विषद केली.यावेळी मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे, मा.जितेंद्र कांबळे, मा.राहुल अप्पा भोसले,सौ.रेखाताई सुधाकर गायकवाड,सौ.अर्चना राजकुमार मेंढे, मा. आशाताई कांबळे,मा.बलभीम गायकवाड मा.भालचंद्र लोखंडे आवर्जून उपस्थित होते.

गेली आठ वर्ष तुगाव येथील ग्रामस्थ अतिशय रचनात्मक पद्धतीने तुगाव आणि पंचक्रोशीत धम्माचा सुमंगल विचार मनोमन रुजविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहेत.

यावेळी धम्मा संदर्भात अनेकांनी आपली मनोगते व्यक्त करून आपल्या आचरणातून धम्माची व्याप्ती अधिकाधिक वाढविण्याचा दृढ निश्चय केला.त्यामुळेच याही वर्षी ही यशस्वी परंपरा दृगोचर करण्यासाठी नूतन पदाधिकारी व नवीन कर्यकरणीची निवड करण्यात आली त्यात अध्यक्ष म्हणून मा. नंदकुमार गायकवाड तर सचिव म्हणून मा.राजकुमार कांबळे यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले.

शेवटी "आपण धम्म परिषदेच्या या उपक्रमशील कार्यरथाला सतत प्रोत्साहन देत अलात यापुढेही असेच सहकार्य करावे अशी विनंती मा.दत्ताभाऊ कांबळे यांनी केली आणि सर्व उपस्थितांचे आभार मानले. बैठकीचे सूत्रसंचालन धर्मेंद्र कांबळे आणि सुदर्शन कांबळे यांनी केले. तर राष्ट्रगितानंतर बैठकीची सांगता झाली.

नूतन कार्यकारिणी.... मा. नंदकुमार गायकवाड (अध्यक्ष), मा. राजकुमार कांबळे (सचिव), इतर कार्यकारणीतील सदस्य खालीलप्रमाणे मा. जितेंद्र कांबळे, मा. सचिन कांबळे, मा. भालचंद्र लोखंडे, मा. शाहूराजे भोसले, मा. बलभीम गायकवाड, मा. धर्मेंद्र कांबळे, मा. राहुल अप्पा भोसले, मा. गोपाळ सुरवसे, मा. सुदर्शन कांबळे, मा. अमृत कांबळे, मा. विद्याचंद्र कांबळे, मा. नीलकंठ (जॉन) कांबळे, मा. दत्ताभाऊ कांबळे, मा. धर्मा बनसोडे, मा. विशाल कांबळे, मा.संकल्प कांबळे, मा. आकाश कांबळे, मा. सूरज गायकवाड, मा. सुधाकर गायकवाड, मा. शिवाजी कांबळे, मा.दिगंबर कांबळे, मा. नागसेन कांबळे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ डिसेंबर २०२४

## उस्ताद झाकीर हुसेन यांना ७३ वादकांच्या तबला वादनातून भावपूर्ण श्रद्धांजली




**छत्रपती संभाजीनगर :** येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने आयोजित "उस्ताद झाकीर हुसेन - ७३ वादकांच्या तबला वादनातून श्रद्धांजली" या विशेष कार्यक्रमाला संगीतप्रेमींचा उदंड प्रतिसाद लाभला.

तापडिया नाट्य मंदिरात पार पडलेल्या या कार्यक्रमात ७३ वादकांनी एकत्रित तबला वादनाद्वारे उस्ताद झाकीर हुसेन यांच्या संगीत परंपरेला अनोखी श्रद्धांजली अर्पण केली. तबल्याच्या सुरेल थापांनी संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख आयोजक राजेश मुंढे यांनी उस्ताद झाकीर हुसेन यांच्या योगदानाचा गौरव करत, त्यांच्या कार्यातून भारतीय संगीताला मिळालेल्या उंचीचे वर्णन केले.मंचावर ५ तबला वादक मुलींसह ७३ जणांच्या एकत्रित तबला वादनाने सभागृह दणाणून सोडले,त्यानंतर रुद्र केचे,चाणक्य दांडगे, गणेश डोळे, दिनेश डोळे, ईशान डोळे आणि सई बाराबोटे यांनी प्रत्येकी तिनताल एकल तबला वादन करून झाकीर हुसेन यांना श्रद्धांजली अर्पण केली.

सभागृहात येतानाच बाहेर अत्यंत सुंदर रांगोळीतून राजेंद्र वाळके यांनी झाकीर हुसेन यांचे चित्र रेखाटले होते.कार्यक्रमात उपस्थित असलेल्या संगीतप्रेमींनी ही सांगीतिक मेजवानी अनुभवताना उस्ताद झाकीर हुसेन यांची आठवण जागवत, त्यांच्या संगीताचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला.

सर्व उपस्थितांनी कार्यक्रमाचे आयोजन करणाऱ्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे आणि कलाकारांचे कौतुक करत, अशा सांगीतिक कार्यक्रमांची परंपरा पुढे सुरू राहावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. याप्रसंगी काँग्रेसचे ॲड.सय्यद अक्रम,अफजल कादरी,फुजैल खान, अण्णा वैद्य, सारंग टाकळकर, सुप्रसिद्ध गायक सचिन नेवपुरकर, सुप्रसिद्ध उद्योजक राजेश उघडे यांची उपस्थिती होती.

सर्व तबला वादक विद्यार्थ्यांच्या एकत्रीकरणासाठी प्रशांत बाराबोटे यांनी मोलाची भूमिका बजावली, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेश अचिंतलवार, योगेश वगदे, राहुल पाटील, सिद्धार्थ मोकळे, ओम बोटवे, योगेश बहादूरे, रोहित बनकर यांनी सहकार्य केले.

## कन्नड येथे राष्ट्रीय ग्राहक दिन उत्साहात साजरा



**कन्नड (अरुण थोरात):** महाराष्ट्र शासन अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग छत्रपती संभाजी नगर तहसील विभाग कन्नड च्या वतीने कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालय कन्नड येथे तहसीलदार विद्याचरण कडवकर यांच्या अध्यक्षतेखाली व कन्नड तालुका राष्ट्रीय ग्राहक समितीचे अध्यक्ष रोहित पिरथानी, उपाध्यक्ष सुनील जैन, सचिव नंदकुमार शेजवळ, मार्गदर्शक अडवोकेट स्वप्निल उपासनी, नायब तहसीलदार निलेश राठोड, पुरवठा निरीक्षक अधिकारी वैभव तोंडे, अन्नसुरक्षा अधिकारी प्रशांत कुचेकर, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे सचिन राऊत व खिल्लारे, एसटी महामंडळाचे बीएम सुर्वे, तालुका कृषी कार्यालयाचे मंगेश राठोड व अनंत राहणे, विद्यालयाचे मुख्याध्यापक रवींद्र पाटील, पर्यवेक्षक देविदास चौधरी, वरिष्ठ लिपिक जगन्नाथ जाधव यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय ग्राहक दिन या निमित्ताने तालुक्यातील विविध शासनाच्या उपक्रमांतर्गत चालवण्यात येणाऱ्या सेवा सुविधा उपक्रम कार्यालय यांच्यावतीने ग्राहक दिनानिमित्त विविध स्टॉल माहिती पत्र भित्तिपत्र लावून योजनांची माहिती देण्यात आली. यात तालुका कृषी कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कन्नड व पिशोर, अन्नसुरक्षा कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आगार, आदींनी शासनाच्या विविध योजनां विषयी सविस्तर माहिती देऊन राष्ट्रीय ग्राहक सहभागी होऊन यशस्वी सहभाग नोंदविला.

यावेळी एडवोकेट स्वप्निल स्वप्निल उपासनी यांनी राष्ट्रीय ग्राहक दिन कायदा १९८६ व व सुधारित कायदा २०१९ यांची माहिती सांगून ग्राहकांचे हक्क व सुरक्षा याविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष समारोप करताना तहसीलदार विद्याचरण कडवकर यांनी राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या निमित्ताने सर्व ग्राहकांनी आपले हक्काच्या प्रती जागरूक असणे अत्यंत आवश्यक आहे. खरेदी करताना चिकित्सकृती ठेवून फसव्या जाहिराती पासून आपण सावध राहिले पाहिजे. असे सांगितले.

विद्यार्थ्यांना स्वयंपूर्ण स्वावलंबन व स्वप्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी हे गुण अवलंबले पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप सनंसे यांनी तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक रवींद्र पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

## हिंदी ही राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील भाषा : प्रा. डॉ. सुनील कुलकर्णी




**जालना ( प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** हिंदी ही राष्ट्रीयच नव्हे तर अंतरराष्ट्रीय स्तरावरील भाषा असून आज का जागतिकीकरनाचा युगामधे भारताकडे जगातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून अंतरराष्ट्रीय कंपन्यांचे लक्ष्य भारताकडे वेधले जात असल्याने आपोआपच हिंदीचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. माहिती तंत्रज्ञानाचा तांत्रिक विकासामुळे जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पर्यंत क्षणार्धात पोहोचण्याची सोय निर्माण झाल्यामुळे भाषिक भाषिक संधी दिवसेंदिवस वाढत आहेत. याचा लाभ विद्यार्थीनी घेऊन आपले भविष्य घडवावे असे आवाहन केंद्रीय हिंदी निदेशालय नवी दिल्ली व केंद्रीय हिंदी संस्थान आगराचे संचालक प्रोफेसर डॉ. सुनील कुलकर्णी यानी केले.

येथील जे.ई.एस. महाविद्यालयाच्या वतीने आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख उद्घाटक म्हणून ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की हिंदी भाषेतील संधी दिवसेंदिवस वाढत असूल नवीन तंत्रज्ञानानुसार काहीं आव्हाने ही समोर उभी राहिली आहेत यावर उपाय योजना करण्याकरिता केंद्रीय हिंदी निदेशालय सतात्याने प्रयत्नशील आहे. केंद्रीय हिंदी निदेशालय व केंद्रीय हिंदी संस्थान यांच्या वतीने विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, शोधार्थी, लेखक, प्रकाशन संस्था, शिक्षण संस्था यांच्या करिता अनेक योजना राबवल्या जातात याचा लाभ सर्वांनी घ्यावा असेही ते म्हणाले.

बोलणाऱ्यांच्या संख्येच्या दृष्टिकोनातून हिंदीचा जगात तीसरा क्रमांक लगतो. बदलत्या काळानुसार हिंदी ने आपली कर्मठ भूमिका मवाळ केलेली असून व्यवहारिक उपयोगा करिता लागणारे अंतरराष्ट्रीय भाषातिल अनेक शब्द हिंदी में स्वीकृत केले आहेत. म्हणूनच आज हिंदी आपले अस्तित्व टाइकूनच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक महत्त्वाची भाषा म्हणून तिने नावलौकिक मिळवला आहे. आज अनेक भाषांचे अस्तित्व नामशेष झाले आहे, काहीं होत आहेत.

त्यांचे पुढच्या पिढ्यांकरिता दस्तावेजीकरण होने अत्यंत आवश्यक आहे. ही महत्वाची जवाबदारी केंद्रीय हिंदी निदेशालय व केंद्रीय हिंदी संस्थान यानी उचलली आहे. असे मत या कार्यशाळेच्या प्रमुख वक्त्या डॉ. सुभद्रा कुमारी सिन्हा यानी व्यक्त केले.

आपल्या अध्यक्षीय समारोपामध्ये महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते यानी विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त भाषिक कौशल्य आत्मसात करावेत असे आवाहन केले तर हिंदी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती करुण दिली.

यावेळी व्यासपीठावर प्रा. शशिकांत चौधरी, प्रा. शिवाजी वानरे यांची उपस्थित होती. कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. वैशाली लोखंडे यानी केले तर प्रा. गजानन बावसकर यानी उपस्थितांचे अभार मानले. यावेळी डॉ. राजेंद्र सोनवणे, प्रा. भाग्यश्री बियानी, प्रा. सुषमा दिपवाल प्रा. बिन्नीवाले, डॉ. प्रवीण चंदनशिवे, विद्यार्थी, शोधार्थी, शिक्षक, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.